पुढारी

# जिल्हा प्रशासनामार्फत संत रविदास जयंती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संत रविदास महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. जिल्हा प्रशासनामार्फत निवासी उपजिल्हाधिकारी शंकरराव जाधव यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अभय जायभाये यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

18 FEB 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हाप…

# लोकमान्य टिळकांकडून स्वातंत्र्यलढ्याचा पाया

## डॉ. सदानंद मोरे; शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन

**कोल्हापूर, ता. १७ :** लोकमान्य टिळक यांनी स्वातंत्र्यलढ्याचा पाया घातला, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित 'लोकमान्य टिळक : व्यक्ती आणि कार्य' या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त आणि टिळक जन्मशताब्दी वर्षानिमित्त साहित्य अकादमी (मुंबई), यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने मानव्यशास्त्र सभागृहात त्याचे आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.



डॉ. मोरे म्हणाले, ''टिळक लोकसंग्राहक, स्वराज्यवादी आणि प्रयत्नवादी होते. महात्मा गांधीजींच्या कार्याची पायाभरणी टिळकांनी केली. टिळकांचे अर्थशास्त्रीय व सहकारविषयक विचार आजच्या समाजासाठी उपयुक्त आहेत.'' या वेळी साहित्य अकादमी सचिव के. श्रीनिवासराव यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी सल्लागार मंडळाचे समन्वयक रंगनाथ पठारे यांनी प्रास्ताविक केले. मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, डॉ. जे. एफ. पाटील, दशरथ पारेकर, डॉ. गिरीश मोरे प्रमुख उपस्थित होते.

दुपारच्या सत्रात संस्कृती व भाषाविषयक विचार आणि गीतारहस्य तसेच लोकमान्य टिळकांचे कृषी अर्थशास्त्रीय विचार, राजकीय विचार, टिळक आणि बुद्ध विषयांवर शोध निबंधांचे वाचन झाले. या सत्रांत एकनाथ पगार, डॉ. नंदकुमार मोरे, वर्षा तोरडमल, भारती पाटील, अभय टिळक, प्रदीप माने यांनी शोधनिबंधांचे वाचन केले. डॉ. प्रकाश पवार अध्यक्षस्थानी होते. साहित्य अकादमी मुंबईचे प्रभारी अधिकारी ओम प्रकाश नागर यांनी आभार मानले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील वसतिगृह ३ मार्चपासून सुरू

## उच्च शिक्षण विभागाचे विद्यापीठाला पत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील वसतिगृह ३ मार्चपासून सुरू करावेत. याबाबतचे पत्र पुणे विभाग उच्च शिक्षण सहसंचालकांनी विद्यापीठास पाठवले आहे. त्याअनुषंगाने वसतिगृह सुरू करण्याची तयारी विद्यापीठाने सुरू केली आहे.

सध्या महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. महाविद्यालये, विद्यापीठातील वसतिगृह सुरू नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडत असल्याने शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे वसतिगृह सुरू करण्याची विद्यार्थी, पालकांमधून मागणी होत होती. त्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये असून २ लाख ५० हजार विद्यार्थी आहेत. विद्यापीठात ४१ अधिविभाग आहेत. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील अनुदानित १३३ महाविद्यालयांत ९१ व शिवाजी विद्यापीठात १० वसतिगृहे आहेत. त्यापैकी तंत्रज्ञान अधिविभागाची वसतिगृहे जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. नुकतीच वसतिगृह अधीक्षकांची बैठक झाली. विद्यापीठाकडून वसतिगृह सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना मागविण्यात आल्या आहेत. लसीचे दोन डोस पूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्राधान्याने प्रवेश असणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ वसतिगृहाचे चिफ रेक्टर डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी दिली.



> “
> उच्च शिक्षण संचालनालयाने शासकीय महाविद्यालये व संस्थेतील वसतिगृह सुरू करताना स्थानिक जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापनाशी चर्चा करून निर्णय घ्यावा, अशा सूचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकांनी दोन दिवसांपूर्वी परिपत्रक काढले आहे. त्यानुसार ईबीसी वसतिगृह कोल्हापूर, बुधगाव (सांगली), राजाराम महाविद्यालयातील दोन वसतिगृह, पाटण (सातारा) मुलींचे प्रियदर्शनी वसतिगृह सुरू होणार आहे.
>
> - **डॉ. हेमंत कठरे,** विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक

पुढारी

# विद्यापीठात २२ फेब्रुवारीपासून स्पर्धा परीक्षा ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने 'मी पीएसआय, एसटीआय होणार' या विषयावर २२ ते २५ फेब्रुवारी दरम्यान ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत विजयश्री फाऊंडेशनचे जॉर्ज क्रूझ, इस्लामपूरचे डॉ. अनिल सत्रे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे निमंत्रक डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

18 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



तिलारीत आढळलेली कीटकभक्षी वनस्पती ड्रॉसेरा बर्मानी.

# तिलारीत कीटकभक्षी वनस्पती

## डॉ. एस. आर. यादव यांच्या शोधकार्याला यश

दोडामार्ग, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ डॉ. एस. आर. यादव यांना तिलारी परिसरातील तिलारी बायो नॅचरल फार्ममधील बांधावर दुर्मिळ प्रजातीतील कीटकभक्षी वनस्पती 'ड्रॉसेरा बर्मानी' आढळली.



डॉ. यादव

डॉ. यादव यांनी जवळजवळ ६० हून अधिक वनस्पतींच्या नवीन प्रजातींची विज्ञानात भर घातली आहे. अभ्यास दौऱ्यासाठी तिलारी परिसरातील तिलारी बायोनॅचरल फार्म या ठिकाणी जैवविविधता संरक्षण, संगोपन आणि संशोधनासाठी आले होते. पाणथळ जागांच्या वनस्पतींची त्यांनी पाहणी केली. त्या ठिकाणी दुर्मिळ आणि वैशिष्ट्यपूर्ण कीटकभक्षी वनस्पती ड्रॉसेरा बर्मानी आढळली. परिसरातील ऑर्किडच्या विविध प्रजातींचा शोध घेताना कॉटोनिआ पेंडीक्युलारीस म्हणजे भ्रमरी या वैशिष्ट्यपूर्ण ऑर्किड प्रजातीचे अस्तित्व असल्याचे निश्चित केले.

### वैशिष्ट्ये

- ड्रॉसेरा बर्मानी कीटकभक्षी वनस्पती
- शास्त्रज्ञ जोहान्स बर्मन यांच्याकडून श्रीलंकेत १७३७ मध्ये शोध
- त्या सन्मानार्थ त्यांचे नाव या वनस्पतीला
- वनस्पतीची रचना फुलासारखी, पाने गुलाबी, लाल

### कसे खातात कीटक?

पानांच्या कडांना बारीक केसतंतूंवर चिकट द्रवाचे बिंदू असतात. या वनस्पतीकडे आकर्षित झालेले कीटक या चिकट द्रवामुळे अडकून बसतात. अडकलेले कीटक वनस्पतीद्वारे स्रवलेल्या रसायनाद्वारे विघटित केले जातात. त्यातील पोषक तत्त्वे वनस्पती शोषून घेतात. या वनस्पतींच्या पानांच्या चमच्यासारख्या पात्यावर लाल व जाड टोकाचे केस असतात. या केसांवर चिकट द्रवाचे आवरण असते. केसाच्या टोकावर चिकट द्रवाचे बिंदू असतात. बिंदू उन्हात दवबिंदूप्रमाणे चकाकतात. म्हणून याला इंग्रजीत 'सन ड्यू' हे नाव पडले आहे. एखादा कीटक या वनस्पतीच्या पानावर बसला, की केस आतल्या बाजूस वळतात आणि कीटक पकडला जातो. वनस्पतीच्या ग्रंथीतील स्रावामुळे कीटकाचे अन्नद्रव्यात रूपांतर होऊन त्याचे वनस्पतींच्या पेशींकडून शोषण होते.

तरूण भारत

# वसतिगृह ३ मार्चपासून सुरू करा

- पुणे विभाग उच्चशिक्षण सहसंचालकांच्या सूचना
- शिवाजी विद्यापीठातील वसतिगृह सुरू करण्यासंदर्भात तयारी सुरू

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील वसतिगृह ३ मार्चपासून सुरू करावेत, असे पत्र पुणे विभाग उच्चशिक्षण सहसंचालकांनी विद्यापीठास पाठविले आहे. त्या अनुषंगाने वसतिगृह सुरू करण्याची तयारी विद्यापीठाने सुरू केली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ वसतिगृहाचे चीफ रेक्टर डॉ. एस. पी. हंगिरगेकर यांनी दिली.

सध्या महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. महाविद्यालये, विद्यापीठातील वसतिगृह सुरू नसल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडत असल्याने शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यामुळे वसतिगृह सुरू करण्याची विद्यार्थी, पालकांमधून मागणी होत होती. या पार्श्वभूमीवर उच्चशिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये असून २ लाख ५० हजार विद्यार्थी आहेत. विद्यापीठात ४१ अधिविभाग आहेत. सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील अनुदानित १३३ महाविद्यालयात ९१ व शिवाजी विद्यापीठात १० वसतिगृह आहेत. त्यापैकी काही वसतिगृहे जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आहेत. नुकतीच वसतिगृह अधीक्षकांची बैठक झाली. विद्यापीठाकडून वसतिगृह सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना मागविण्यात आल्या आहेत. लसीचे दोन डोस पूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे. स्थानिक जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापनाशी चर्चा करुन वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय घ्यावा, अशा सूचना दिल्या आहेत. ईबीसी वसतिगृह कोल्हापूर, बुधगाव (सांगली), राजाराम महाविद्यालयातील दोन वसतिगृह, पाटण (सातारा) मुलींचे प्रियदर्शनी वसतिगृह सुरू होणार आहेत, अशी उच्चशिक्षण सहसंचालक डॉ. हेमंत कठरे यांनी दिली.

तरूण भारत

# विद्यापीठ पदव्युत्तरच्या परीक्षा १५ मार्चपासून

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ हिवाळी सत्रातील पदव्युत्तर पारंपारिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा १५ मार्चपासून सुरू होणार आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या नियमानुसार परीक्षा ऑनलाईन घेण्यात येणार आहेत. संपूर्ण अभ्यासक्रमावर अधारीत ५० गुणांसाठी २५ प्रश्न विचारले जाणार आहेत. प्रत्येक प्रश्नाला दोन गुण असून वस्तुनिष्ठ पद्धतीने परीक्षा होणार असून १ तासाचा वेळ असणार आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन करून परीक्षा घेतल्या जातील. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालन गजानन पळसे यांनी केले आहे.